**महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ**

**परिपत्रक**

मका/प्रसिद्धी/२०१६-१७/93८.

दूरध्वनी क्र.- ०२२-२४३०६७१७/४३२२६८२५

फॅक्स क्र. - ०२२-४२२१००१९

ई-मेल - pro.mlwb-mh@gov.in

हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन, सेनापती बापट मार्ग, एलफिन्स्टन, मुंबई

दिनांक - 10.10.2016.

**विषय : कार्यालयीन कामकाजासाठी शासकीय ई-मेल चा वापर करण्याबाबत.**

संदर्भ : १. शासनाचे पत्र ई-मेल २०१४/प्र.क्र.०९/प्रशासन - २, दि.१४ ऑगस्ट २०१४

२. मका/प्रजवि/१५-१६/२२ दि.१७.२.२०१६

३. मा.कल्याण आयुक्त यांनी मान्य केलेली टिपणी दि.२९.८.२०१६

उपरोक्त संदर्भान्वये, शासकीय माहितीच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून तसेच सार्वजनिक अभिलेख अधिनियम, १९९३ च्या कलम ४ मधील तरतुदीनुसार शासकीय कामकाजात केवळ शासकीय ई-मेल आयडीचाच वापर करण्याच्या सूचना शासनाकडून देण्यात आल्या आहेत.

त्यानुषंगाने मंडळातर्फे मध्यवर्ती कार्यालय, विभागीय कार्यालय, गट कार्यालय येथील संबंधित अधिकाऱ्यांना शासकीय ई-मेल आयडी तयार करुन देण्यात आले आहेत. तथापी, अद्यापही काही कार्यालयांकडून शासकीय कामकाजाकरिता Gmail / Rediffmail आदी खाजगी ई-मेल आयडीचा वापर होत असल्याचे निदर्शनास आले आहे.

आपणास कळविण्यात येते की, यापुढे कार्यालयीन कामकाजात केवळ शासकीय ई-मेल आयडीचाच वापर करण्यात यावा. खाजगी ईमेल वापरामुळे काही वाद उद्भवल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी संबंधितांची राहील, याची नोंद घ्यावी.

प्रसिद्धी व जनसंपर्क अधिकारी
कल्याण आयुक्तांकरिता

प्रत,

सर्व अधिकारी, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई
सहायक कल्याण आयुक्त, सर्व विभागीय कार्यालये
सहायक लेखा अधिकारी, सर्व विभागीय कार्यालये
कामगार विकास अधिकारी, नागपूर / पुणे
कामगार कल्याण अधिकारी, सर्व गट कार्यालये
कल्याण आयुक्तांचे स्वीय सहाय्यक, म.का.मुंबई